# यूजीसी, एनसीटीईसाठी सामाईक नियमावली

**पुणे, ता. ८ :** देशातील विद्यापीठे व महाविद्यालयांना युनिव्हर्सिटी ग्रॅन्ट कमिशन (यूजीसी), ऑल इंडिया काउंन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) आणि नॅशनल काउंन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एनसीटीई) यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता यावी, यासाठी या संस्थांची 'सामाईक नियमावली, सामाईक प्रक्रिया' करणार असल्याची माहिती केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी सोमवारी दिली.

'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स'च्या २४ व्या वार्षिक पदवीप्रदान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी निती आयोगाचे अध्यक्ष राजीव कुमार आणि कुलपती राजस परचुरे उपस्थित होते. या वेळी पदव्युत्तर व पीएच.डी.च्या विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

जावडेकर म्हणाले, "केंद्र सरकारने केलेल्या 'नवीन शिक्षण धोरण, स्वच्छ भारत अभियान, नोटाबंदी, मुद्रा योजना, रूसा, स्वयम्, उच्चतम आविष्कार योजना आणि शिक्षणाचा मूलभूत अधिकार'द्वारे देशात परिवर्तन होत आहे."

जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभर विद्यापीठांमध्ये भारतातील एकाही विद्यापीठाचा समावेश नाही. त्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आले. नवीन वर्षात भारतीय विद्यापीठे जागतिक क्रमवारीत येतील, असा विश्वास जावडेकर यांनी व्यक्त केला.